TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे-४०१ १०१,दुरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८, Email :- pro@mbmc.gov.in
जनसंपर्क विभाग

जा.क्र.मनपा/जनसंपर्क/ ८६ /२०२२-२३ दि.:- ०३ / ०६ /२०२२

प्रति,

मा.संपादक/जाहिरात व्यवस्थापक
दैनिक/साप्ता. ठाणे की आवाज

---------------------------------------

---------------------------------------

विषय :- वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांनुसार आपणांस कळविण्यात येते की, सोबत जोडलेली मिरा भाईंदर महानगरपालिकेची जाहिरात दि. ०४ / ०६ /२०२२ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

जाहिरात प्रसिध्दीकरिता सुचना :-

१) सदर जाहिरात हि शासकिय दराप्रमाणे प्रसिध्द करणे, आपणांस बंधनकारक राहील.
२) सदर जाहिरातीत १० फॉन्टपर्यंतच्या साईजच्या व कमीत-कमी जागेचा वापर करुन जाहिरात प्रसिध्द करावी.
३) सदर जाहिरात प्रसिध्द करतेवेळी महानगरपालिकेचा लोगो प्रसिध्द करणे आवश्यक राहील.
४) सदर जाहिरातीत www.mbmc.gov.in या महानगरपालिकेच्या वेबसाईटचा उल्लेख करावा.
५) जाहिरात प्रसिध्द करतेवेळी जनसंपर्क विभागातील जावक क्रमांकाचा उल्लेख करावा.
६) जाहिरातीत छपाई चुक झाल्यास, आपणांस विनामुल्य पुढील अंकांत जाहिरात प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.
७) जाहिरात प्रसिध्द केलेबाबत वृत्तपत्राच्या चार प्रती दुस-या दिवशी कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.
८) जाहिरात प्रसिध्द केलेले वर्तमान पत्राचे बिल १५ दिवसांत या कार्यालयास सादर करावे.
९) पाठविलेल्या आर.ओ. मध्ये कुठलाही फेरफार करु नये.
१०) पाठविलेला आर.ओ. आपल्याच वृत्तपत्राच्या नावानिशी पाठविला आहे, याची पुर्ण खात्री करावी व त्यानंतरच वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करावी.
११) काही शंका असल्यास जनसंपर्क विभागाशी संपर्क करावा.

वरील सुचनांचे अधीन राहून, काटेकोरपणे पालन करणे आपणांस बंधनकारक राहील.

(राजकुमार घरत)
जनसंपर्क अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :- जाहिरात

# मिरा भाईंदर महानगरपालिंका

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
तळ मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

जा.क्र. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/ ९६५/२०२२-२३ | दिनांक : ०३/०६/२०२२

## // जाहिर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाड काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र | ठिकाण | वृक्षाचे नाव | संख्या | तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | ३६५ शनिवार निवास,रेतिबंदर रोड,जमात खाना समोर घोडबंदर गाव,मिरारोड(पुर्व) | नारळ | ०१ | धोकादायक |
| २ | शुभम हाईटस को.ऑ.हौ.सो.लि.इंद्रलोक फेस—६ भाईदर (पुर्व) | रेन्ट्री | ०२ | |
| ३ | गणेश को.ऑ.हौ.सो.लि. मिरारोड (पु) | सप्तपर्णी | ०१ | |
| ४ | वाडे निवास, मिरागावठाण, महाजनवाडी,मिरारोड पु. | नारळ | ०१ | |
| ५ | ए-००२ सरस्वती एक्शाईन एनक्लेव ग्राउंड फलोर मिरारोड (पु) | बॉटलपाम | ०३ | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (वृक्ष प्राधिकरण), उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. सबब विस्तृत माहिती महापालिका संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

जा.क्र. मनपा/जनसंपर्क/८६/2022-23
दि. 31/8/2022

(योगेश गुणिजन)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

तळ मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र./मनपा/वृ.प्रा./मिरारोड/ ९६७ /२०२२-२३ दिनांक: ०३/०६/२०२२

प्रति,
जनसंपर्क अधिकारी,
जनसंपर्क विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

जनसंपर्क विभाग
आवक क्र. ८६
दिनांक ३/६/२०२२

**विषय — स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

सदर नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन त्याची प्रत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागास उपलब्ध करुन देण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

(योगेश गुणिजन)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका